| MHPU240016652024 | **रे. मु. नं. १७७/२०२४** |
| --- | --- |
| | **गिताबाई थोरात व इतर**<br>विरुद्ध<br>**चंद्रकांत थोरात व इतर** |

## निशाणी क्र.०५ वरील आदेश

वादींनी प्रस्तुतचा दावा ठराव, निरंतर ताकीद व नुकसानभरपाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. निशाणी क्र.५ वरील अर्ज व त्यासोबत दाखल केलेले शपथपत्र वाचले. वादींतर्फे वकील श्री. ब—हाटे यांचा युक्तीवाद ऐकला. वादींचे कथनानुसार, दावा मिळकत अ ही वादी यांना वाटपाने आलेली जमीन असुन त्यामध्ये वादी हे त्यांच्या कुटूंबासह राहतात. दावा मिळकत ब गट क्र.३१५ ही मिळकत प्रतिवादी यांची असुन सदर मिळकतीतून जाणारा ९ x ६५ फूट रस्ता हा दाव्याचा विषय आहे. प्रतिवादी यांच्या गट क्र.३१५ मधुन असणारा रस्ता हा गावातुन येणा—या मुख्य रस्त्यास मिळतो. वादी हे सन १९७४ पासुन सदर रस्त्याचा येण्या—जाण्यासाठी वापर करतात. त्यास आजतागायत प्रतिवादी यांचे पूर्वज अथवा प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केला नव्हता. त्यामुळे, वादीस दावा मिळकत ब मधुन येण्या—जाण्याचा हक्क निर्माण झालेला आहे.

**०२.** वादींच्या कथनानुसार, प्रतिवादींनी दि.१९/०८/२०२४ रोजी वादी यांना सदर रस्त्याचा वापर करण्यास हरकत घेतली. तसेच, दि.२०/०८/२०२४ रोजी प्रतिवादी यांनी जे.सी.बी. च्या साहायाने वादी यांच्या दावा मिळकतीतील घरासमोरील झाडे तोडुन वादींचे घरासमोर भराव आणुन टाकुन वादीच्या मिळकतीत बेकायेदशीरपणे घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, दि.२३/०९/२०२४ रोजी प्रतिवादींनी जे.सी.बी. च्या साहायाने दावा मिळकत अ मध्ये सपाटीकरण करण्याचा प्रयत्न केला व दावा मिळकत ब मध्ये भराव टाकला. त्याबाबत वादी यांनी पोलिस ठाण्यात तक्रार देउनही प्रतिवादींनी त्यांना जुमानले नाही. त्यामुळे, वादींना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले.

**०३.** वादींनी दाव्यासोबत दावा मिळकतीचे सातबारा उतारे, ८अ उतारा, पोलिस ठाण्यात दिलेली तक्रार व दावा मिळकतीची वस्तुस्थिती दर्शविणारे रंगीत छायाचित्रांची प्रत दाखल केली आहे. वादींच्या कथनानुसार, गट क्र.६१५ ही मिळकत प्रतिवादी यांच्या मालकीची असुन त्यातील ९ x ६५ फूट रस्त्यातुन ते सुमारे ५० वर्षांपासुन विनाहरकत वहिवाट करीत आहेत. परंतु, प्रतिवादी यांनी सदर रस्त्यावर भराव टाकुन वादी यांना सदर रस्ता वापरण्यापासुन हरकत घेतलेली आहे. तसेच, प्रतिवादी हे दावा मिळकत अ मध्ये वादींच्या वहिवाटीस बेकायदेशीररित्या हरकत अडथळा करीत आहेत. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांचे गट क्र.६१५ मध्ये हक्क अधिकार गुंतले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अशा परिस्थितीत, वादीने मांडलेल्या तक्रारीचे स्वरूप पाहता, त्याबाबत दोन्ही बाजूंचे म्हणणे दाखल होवून गुणदोषांवर सदरचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज निर्गत करणे गरजेचे आहे. त्यामुळे, प्रतिवादींचा बचाव पाहून तुर्तातुर्त ताकिद अर्जावर आदेश करणे न्यायोचीत ठरणार आहे. सबब, वर नमूद परिस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

**१.** प्रतिवादी यांना वादीचे निशाणी क्र.५ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्जावर दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत त्यांचेविरुद्ध मनाई हुकूम पारीत करण्यात का येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढण्यात यावी.

**२.** मागणी केल्यास अर्जंट प्रोसेस फी व स्पेशल बेलीफ भत्ता मंजूर करण्यात येतो.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.09.28 11:33:30 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**

दि. : २७/०९/२०२४ **प्रभारी** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
स्थळ : घोडेगांव घोडेगांव, जि. पुणे.